2025 III 15 - 1100

२०२५.०३.१५ - ११००

N 862

Seat No. / बैठक क्र. | | | | | | | |

Time : 2 Hours SOCIAL SCIENCES (73) HISTORY & POLITICAL SCIENCE—PAPER–I (M)

वेळ - २ तास सामाजिक शास्त्रे (७३) इतिहास व राज्यशास्त्र—पेपर-१ (म)

(REVISED COURSE)

Pages - 11 Total Marks : 40

पृष्ठे - ११ एकूण गुण - ४०

सूचना :— (1) *सर्व* कृती/प्रश्न सोडविणे आवश्यक आहे.

(2) उजवीकडील अंक प्रश्नांचे/कृतींचे पूर्ण गुण दर्शवितात.

(3) प्रश्न क्रमांक 1 ते 5 प्रश्न/कृती इतिहास व प्रश्न क्रमांक 6 ते 9 प्रश्न/कृती राज्यशास्त्र या विषयांवरील आहेत.

(4) प्रश्न क्रमांक 1(अ) आणि 6 मध्ये संपूर्ण विधाने लिहिणे आवश्यक आहे.

(5) प्रश्न क्रमांक 2(अ) आणि 8(ब) मधील संकल्पना चित्रे/कृती त्याच नमुना आराखड्यात पेनाने उत्तरपत्रिकेत तयार करणे अपेक्षित आहे.

(6) प्रश्न 1ला (अ), (ब) व प्रश्न 6वा या प्रश्नांची उत्तरे उत्तरपत्रिकेत एकापेक्षा जास्त वेळा लिहिलेले असेल तर प्रथम लिहिलेले उत्तर हे गुणांसाठी गृहीत धरले जाईल.

P.T.O.

1. (अ) **दिलेल्या पर्यायांपैकी योग्य पर्याय निवडून विधाने पूर्ण करा :** 3

(1) जगातील सर्वात प्राचीन संग्रहालय .... या शहराचे उत्खनन करताना सापडले.

(अ) दिल्ली

(ब) हडप्पा

(क) उर

(ड) कोलकाता

(2) महाराष्ट्र राज्याचे पहिले मुख्यमंत्री .... हे होते.

(अ) वसंतराव नाईक

(ब) यशवंतराव चव्हाण

(क) शंकरराव चव्हाण

(ड) वसंतदादा पाटील

(3) हितोपदेश या संस्कृत ग्रंथाचा जर्मन भाषेत अनुवाद .... यांनी केला.

(अ) जेम्स मिल

(ब) फ्रेडरिक मॅक्समुलर

(क) माऊंटस्टुअर्ट एल्फिन्स्टन

(ड) जॉन मार्शल

(ब) पुढीलपैकी प्रत्येक गटातील चुकीची जोडी ओळखून पुन्हा लिहा : 3

(1) (*i*) रायगडाला जेव्हा जाग येते — वसंत कानेटकर

(*ii*) टिळक आणि आगरकर — विश्राम बेडेकर

(*iii*) साष्टांग नमस्कार — आचार्य अत्रे

(*iv*) एकच प्याला — अण्णासाहेब किर्लोस्कर

(2)	*(i)*	लिओपॉल्ड व्हॉन रांके	—	द सिक्रेट ऑफ वर्ल्ड हिस्टरी
	(ii)	मायकेल फुको	—	आर्केऑलॉजी ऑफ नॉलेज
	(iii)	कार्ल मार्क्स	—	दास कॅपिटल
	(iv)	रेने देकार्त	—	रिझन इन हिस्टरी
(3)	*(i)*	प्रभाकर	—	आचार्य प्र. के. अत्रे
	(ii)	दर्पण	—	बाळशास्त्री जांभेकर
	(iii)	दीनबंधू	—	कृष्णराव भालेकर
	(iv)	केसरी	—	बाळ गंगाधर टिळक

2. **(अ)** **दिलेल्या सूचनेनुसार कृती करा (कोणतेही *दोन*) :** **4**

(1) पुढील तक्ता पूर्ण करा :



कोलकाता → ....

दिल्ली → ....

हैदराबाद → ....

मुंबई → ....

(2) पुढील संकल्पनाचित्र पूर्ण करा :



(3) पुढील संकल्पनाचित्र पूर्ण करा :



(ब) थोडक्यात टिपा लिहा (कोणतेही *दोन*) : 4

(1) उपयोजित इतिहास

(2) मराठा चित्रशैली

(3) स्थळ कोश.

3. पुढील विधाने सकारण स्पष्ट करा (कोणतेही *दोन*) : 4

(1) फुको यांच्या लेखनपद्धतीला 'ज्ञानाचे पुरातत्त्व' म्हटले आहे.

(2) बखर हा ऐतिहासिक साहित्यातील महत्त्वाचा प्रकार आहे.

(3) चित्रपट माध्यमात इतिहास हा विषय महत्त्वाचा आहे.

(4) तंत्रज्ञानाचा इतिहास अभ्यासावा लागतो.

4. दिलेल्या उताऱ्याचे वाचन करून त्याखालील प्रश्नांची उत्तरे लिहा : 4

मेजर ध्यानचंद हे भारतीय हॉकीचे खेळाडू आणि संघनायक होते. त्यांच्या नेतृत्वाखाली 1936 साली भारतीय हॉकी संघाने बर्लिन ऑलिंपिकमध्ये सुवर्णपदक जिंकले. त्यापूर्वी 1928 आणि

1932 मध्येही भारतीय हॉकी संघाने सुवर्णपदके जिंकली होती. तेव्हा ध्यानचंद हे भारतीय संघाकडून खेळले होते. 29 ऑगस्ट हा त्यांचा जन्मदिवस 'राष्ट्रीय क्रीडादिवस' म्हणून पाळला जातो. त्यांना 'हॉकीचे जादूगार' असे म्हणतात. 1956 मध्ये त्यांच्या हॉकीतील कामगिरीबद्दल त्यांना 'पद्मभूषण' या सन्मानाने विभूषित करण्यात आले.

प्रश्न :

(1) 1936 मध्ये भारतीय हॉकी संघाचे संघनायक कोण होते ? 1

(2) भारतात कोणता दिवस राष्ट्रीय क्रीडादिवस म्हणून साजरा केला जातो ? 1

(3) हॉकी खेळविषयी आपले मत मांडा. 2

5. पुढील प्रश्नांची सविस्तर उत्तरे लिहा (कोणतेही *दोन*) : 6

(1) स्त्रीवादी इतिहासलेखन म्हणजे काय ?

(2) कला क्षेत्रात व्यवसायाच्या कोणत्या संधी उपलब्ध आहेत ? हे स्पष्ट करा.

(3) पोवाडा म्हणजे काय ? हे स्पष्ट करा.

(4) पर्यटनाचे कोणतेही **तीन** प्रकार स्पष्ट करा.

6. दिलेल्या पर्यायांपैकी योग्य पर्याय निवडून विधाने पूर्ण करा : 2

(1) महाराष्ट्रात स्थानिक शासनसंस्थांमध्ये महिलांसाठी .... जागा राखीव ठेवण्यात आलेल्या आहेत.

(अ) 25%

(ब) 30%

(क) 40%

(ड) 50%

(2) शेतीचे उत्पादन वाढवण्यासाठी आणि अन्नधान्याबाबत स्वयंपूर्ण होण्यासाठी .... करण्यात आली.

(अ) जलक्रांती

(ब) हरितक्रांती

(क) औद्योगिकक्रांती

(ड) धवलक्रांती

7. पुढील विधाने चूक की बरोबर ते सकारण स्पष्ट करा (कोणतेही दोन) : 4

(1) विशिष्ट प्रसंगी निवडणूक आयोग एखाद्या मतदार संघात पुन्हा निवडणुका घेतात.

(2) माहितीच्या अधिकारामुळे शासनाच्या कारभारातील गोपनीयता वाढली आहे.

(3) आघाडी शासनातून अस्थिरता निर्माण होते.

8. (अ) पुढील संकल्पना स्पष्ट करा (कोणतेही एक) : 2

(1) अल्पसंख्याकविषयक तरतुदी

(2) कामगार चळवळ.

(ब) दिलेल्या सूचनेनुसार कृती करा (कोणतीही एक) : 2

(1) पुढील तक्ता पूर्ण करा :



(1) .... (1) ....

(2) .... (2) ....

(2) पुढील संकल्पनाचित्र पूर्ण करा :



9. पुढील प्रश्नाचे थोडक्यात उत्तर लिहा (कोणतेही एक) : 2

(1) राष्ट्रीय पक्ष म्हणून मान्यता मिळवण्यासाठी निवडणूक आयोगाने स्पष्ट केलेले निकष सांगा.

(2) भारतात लोकशाहीच्या यशासाठी कोणत्या बाबी आवश्यक आहेत ?